नवीन “परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना” लागू असलेल्या कर्मचाऱ्यांच्या सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी स्तर-२ मध्ये जमा करण्याबाबतची कार्यपध्दती

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः अंनियो-३४१८/प्र.क्र.२२/टिएनटी - ६
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२,
तारीख: २१ जून, २०१९

वाचा -

१. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५.
२. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अंनियो-१००७/१८/सेवा-४, दिनांक ७/७/२००७.
३. वित्त विभाग, परिपत्रक क्र.वेपूर -१२०९/प्र.क्र.६९/सेवा-९, दिनांक २९/४/२००९.
४. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.अंनियो-१००६/(२३/०६) माशि-२, दिनांक २९/११/२०१०.
५. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अंनियो-१०१०/प्र.क्र.६७/सेवा-४, दिनांक १४/१२/२०१०.
६. वित्त विभाग, परिपत्रक क्र.अंनियो-१०१०/प्र.क्र.६७/सेवा-४, दिनांक १६/११/२०१२.
७. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. अंनियो ३४१६/प्र.क्र.८६/१६/टीएनटी-६, दिनांक २०/१२/२०१७.

प्रस्तावना

संदर्भाधिन क्र. १ येथील शासन निर्णयान्वये दिनांक १ नोव्हेंबर,२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना अंमलात आली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती संदर्भाधिन क्र. २ येथील शासन निर्णयान्वये ठरविण्यात आली आहे. ज्या शासकीय कर्मचाऱ्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू आहे, अशा कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीमुळे दि.१/१/२००६ ते दि.३१/३/२००९ पर्यंतच्या कालावधीतील सुधारित वेतनाच्या थकबाकीची रक्कम त्यांच्या नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या खात्यात जमा करण्याचा सूचना संदर्भाधिन क्र. ३ च्या परिपत्रकातील परि.१५.२ अन्वये देण्यात आल्या आहेत. नवीन “परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना” लागू असलेल्या कर्मचाऱ्यांच्या सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी स्तर-२ मध्ये जमा करण्याबाबतची कार्यपध्दती संदर्भाधिन क्र.५ अन्वये निश्चित केलेली आहे. नवीन “परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना” लागू असलेल्या कर्मचाऱ्यांच्या सहाव्या वेतन आयोगाच्या थकबाकीवरील व्याज व नियमित मासिक अंशदानावरील व्याज जमा करण्याबाबत संदर्भाधिन क्र. ६ अन्वये सूचना दिलेल्या आहेत.

राज्यातील मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक /उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपद्धती संदर्भाधीन क्र.४ येथील शासन निर्णयान्वये ठरविण्यात

आली आहे. राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षक व मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक /उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी नवीन "परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना" लागू असलेल्या कर्मचाऱ्यांच्या सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी स्तर-२ मध्ये जमा करण्याबाबतची कार्यपध्दती निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षक व मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक /उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी नवीन "परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना" लागू असलेल्या कर्मचाऱ्यांच्या सहाव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीमुळे दि.१/१/२००६ ते दि.३१/३/२००९ पर्यंतच्या कालावधीतील सुधारित वेतनाच्या थकबाकीची रक्कम स्तर-२ मध्ये जमा करण्याबाबतची कार्यपध्दती खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे. :-

१) परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेंतर्गत स्तर २ कार्यान्वित करण्यात येत असून त्यामध्ये पुढील आदेश होईपर्यंत केवळ कर्मचाऱ्यांच्या दि.१/१/२००६ ते दि.३१/३/२००९ पर्यंतच्या कालावधीतील सुधारित वेतनाच्या थकबाकीची रक्कम व त्यावरील व्याजाची रक्कम जमा करण्यात येईल.

२) थकबाकीची रक्कम सन २००९-१० पासून स्तर-२ मध्ये जमा करण्याबाबतची कार्यवाही शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. वेपूर -१२०९/प्र.क्र.६९/सेवा-९, दिनांक २९/४/२००९ मधील परि.१५.१ (क) व परि.१५.३ मधील सूचनांप्रमाणे करण्यात यावी. तसेच थकबाकीची रक्कम प्रत्यक्षात कोणत्याही दिनांकास जमा केली असली तरी, ज्यावर्षी थकबाकीची रक्कम जमा करावयाची आहे, त्या वर्षाच्या १ जून पासून त्यावर व्याज देय राहील. जमा झालेली रक्कम ठरवून दिलेल्या कालावधीनंतर काढण्याकरिताच्या कार्यपध्दतीचे आदेश स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येतील.

३) दि.१/१/२००६ ते दि.३१/३/२००९ या कालावधीत सेवात्याग केलेल्या/ मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्यांना थकबाकी अनुज्ञेय असल्यास त्याप्रकरणी शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.वेपूर -१२०९/प्र.क्र.६९/सेवा-९, दिनांक २९/४/२००९ मधील परि.१५.१ (ड)(ई) व (फ) मधील सूचनांप्रमाणे व शासन निर्णय शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.अंनियो ३४१६/प्र.क्र.८६/१६/टिएनटी-६, दिनांक २०/१२/२०१७ सोबतच्या जोडपत्र १ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

४) स्तर-२ मध्ये जमा होणाऱ्या रक्कमेचे लेखांकन व इतर कार्यपध्दतीबाबत उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरण (शालेय शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे नियंत्रण असेल. उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरणाकडून संबंधित कर्मचाऱ्यांना त्यांच्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांमार्फत प्रत्येक वित्तीय वर्षाच्या अखेरीस वार्षिक विवरणपत्र पाठविण्यात येईल.

५) आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी वेतन देयकासोबत परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेखाली करण्यात आलेल्या वजातीची अनुसूची जोडताना स्तर १ व स्तर २ खाली जमा होणाऱ्या रकमा कर्मचाऱ्यांच्या नावासमोर स्वतंत्रपणे दर्शविणे आवश्यक आहे. या करिता परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना शालार्थ प्रणालीत स्तर-२ मध्ये जमा होणाऱ्या रकमेची अनुसूची तयार करण्याबाबत उपलब्ध असलेल्या कार्यपध्दतीचा वापर करण्यात यावा.

६) परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेमधील स्तर-२ मध्ये जमा होणारी रक्कम व त्यावरील व्याजाची रक्कम खालील लेखाशीर्षाखाली जमा करण्यात यावी.:-

i) ८३४२ - इतर ठेवी ,
११७ - शासकीय कर्मचाऱ्यांकरिता परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना,
(०३) परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना,
(०३)(११) मान्यताप्राप्त व अनुदानित खाजगी प्राथमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अंशदान स्तर -२
(८३४२ ५४७३)

ii) ८३४२ - इतर ठेवी ,
११७ - शासकीय कर्मचाऱ्यांकरिता परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना,
(०३) परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना,
(०३)(१२) मान्यताप्राप्त व अनुदानित खाजगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, अध्यापक विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अंशदान स्तर -२
(८३४२ ५४८२)

iii) ८३४२ - इतर ठेवी ,
११७ - शासकीय कर्मचाऱ्यांकरिता परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना,
(०३) परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना,
(०३)(१३) जिल्हा परिषदेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अंशदान स्तर -२
(८३४२ ५४९१)

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व अनौपचारिक संदर्भ क्र.२५/१९/सेवा-४, दिनांक ११/२/२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६२११६१७०६२२२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VARSHA MILIND KARANDIKAR

Digitally signed by VARSHA MILIND KARANDIKAR
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=3f5189bc4e5751dd492acf5c90b732e1e04b7ae09704574983de5a9ea7bdbef5, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=1f6f75a359ad152edc7163322a272f034b3410680f731760fce9dad40de05c86, ou=SCHOOL EDUCATION DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VARSHA MILIND KARANDIKAR
Date: 2019.06.21 16:18:29 +05'30'

(व.मि.करंदीकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई,
२. महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
३. महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
४. महालेखाकार (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर,
५. संचालक, लेखा व कोषागरे, मुंबई,
६. उपसंचालक, राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, नवीन प्रशासकीय भवन,५ वा मजला, मंत्रालयासमोर,मुंबई ३२,
७. अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई,
८. संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय,मुंबई,
९. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा,कोकण भवन, वाशी, नवी मुंबई
१०. उप-मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/औरंगाबाद /नाशिक /अमरावती
११. वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक
१२. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
१३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१४. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१५. सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष,
१६. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
१७. शिक्षण संचालक(प्राथमिक, माध्यमिक/उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
१८. सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण)
१९. सर्व विभागीय शिक्षण उप संचालक
२०. शिक्षण निरीक्षक, बृहनमुंबई, दक्षिण/उत्तर/पश्चिम,
२१. शिक्षणाधिकारी(सर्व)
२२. शालेय शिक्षण विभागातील सर्व कार्यासने,
२३. निवडनस्ती, कार्यासन टिएनटी-६.